# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि २३ जुलै २०२३

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४१५/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २२/०७/२०२३ रोजी २१.०० वा ते दि. २३/०७/२०२३ रोजी पहाटे ०५.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २३/०७/२०२३ रोजी १४.१० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सिध्देश्वर आण्णाराव पाटील, वय- ५६ वर्षे, व्यवसाय- व्यापार, रा. ब्लॉक नं. ०१, नवीन संतोष नगर, जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ९,००,०००/- रु एक पांढऱ्या रंगाची टोयोटा कंपनीची इनिव्हा क्रिस्टा Z मॉडेलची कार |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची कार क्रं. एम एच १३ सी झेड १००८ ही वरील ठिकाणी पार्क केली असता, कोणीतरी अज्ञात इसमाने कारची काच फोडुन, फिर्यादीच्या संमतीवाचून, फिर्यादीच्या रखवालीतुन चोरुन नेली आहे म्हणून. तपासः- पोसई- गायकवाड- **७०२०२३७५३६** |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४१४/२०२३ भादवि ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २२/०७/२०२३ रोजी २०.३० वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरासमोर, कल्याण नगर भाग-१, जुळे सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २३/०७/२०२३ रोजी १३.५३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सौ. जमना राजेंद्रसिंग ठाकुर, वय- ५२ वर्षे, रा. कल्याण नगर भाग-१, जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) उमेश पांडुरंग जाधव, २) सविता बनसोडे, दोघे रा- कल्याण नगर भाग-१, जुळे सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे पती हे कुत्र्यास घरासमोर घेऊन फिरत असताना फिर्यादीच्या कुत्र्याने फिर्यादीच्या पतीच्या हातास हिसका मारुन पळुन गेला. कुत्रा हिसका मारल्यामुळे फिर्यादीचे पती घरासमोर राहणारे आरोपीत क्रं. २ यांनी त्याच्या घरासमोर अंब्याच्या झाडाला लावलेले काठीवर पडले, त्यावेळेस ती काठी मोडली म्हणून वरील आरोपीतांनी फिर्यादीच्या पतीस व फिर्यादीच्या मुलास शिवीगाळ करुन लाथाबुकयाने मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली आहे. तसेच आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीच्या डोक्यात दगड मारुन फिर्यादीस जखमी केले आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ११८७ फुलारी |